महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २१२ वे दिनांक : २६/०७/२०२६ वार : रविवार

## राजीनाम्यानंतर राजकीय घडामोडींना वेग; फडणवीसांची दिल्लीवारी, शिंदेंचाही दौरा



**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर केंद्र सरकार नरमले असल्याचे समोर आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील आता तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

देवेंद्र फडणवीस दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे आता फडणवीसांना केंद्रात संधी मिळणार का? असा प्रश्न देखील आता उपस्थित होत आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस दिल्लीत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेऊन परतल्याची माहिती मिळत आहे. मात्र, त्यांनी दिल्लीत कोणत्या नेत्यांची भेट घेतली, याबाबतची माहिती समजू शकली नाही. फडणवीस मुंबईत परतल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुद्धा तातडीने दिल्लीला रवाना होणार असल्याचे समजते.

महाराष्ट्रातील मंत्रिमंडळात लवकरच फेरबदल होणार असल्याची चर्चा होती. सोबतच आता शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळातही फेरबदल होणार असल्याचे समजते. या साऱ्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्लीहून निमंत्रण आले आहे. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे केंद्रासोबत राज्यात नेमके काय बदल होणार, याची उत्सुकता लागली आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, मला वाटते की हा विद्यार्थ्यांचा आणि युवा शक्तीचा प्रचंड विजय आहे. हा लोकशाहीचा विजय आहे. परंतु, आता ज्या बातम्या येत आहेत की धर्मेंद्र प्रधान यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे राजीनामा सादर केला आहे. पंतप्रधानांनी स्वीकारला आहे का? पर्यायी व्यवस्था काय केली आहे, याबद्दल अद्याप आपल्याला माहीत नाही. परंतु, हा लोकशाहीमधला प्रचंड मोठा विजय आहे आणि हा मोदी सरकारच्या काळातला पहिला जबाबदारी स्वीकारून दिलेला राजीनामा आहे. याला एका वाक्यात सांगायचे झाले तर धिस इज द बिगिनिंग ऑफ द एंड.

पुढे बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, हे सरकार फार काळ टिकणार नाही. मोदी सरकारचा मनमानी कारभार यापुढे जनता स्वीकारणार नाही, हे यातून सिद्ध झाले आहे. जो दबाव निर्माण झाला होता विद्यार्थ्यांच्या आंदोलनामुळे त्यामुळे सरकारला भाग पाडले गेले आहे. हा निर्णय संसदेच्या अधिवेशनाच्या आधी झाला असता तर संसदेचे कामकाज सुरळीत पार पडले असते. कदाचित ठोस उपाययोजना करता आली असती. पण आत्तापर्यंत सरकारची कारकीर्द पाहता स्वतःची चूक कधी स्वीकारायची नाही आणि हट्टीपणाने सरकार चालवायचे हे 12 वर्षे आपण पाहिले. पण आता विद्यार्थ्यांच्या समोर सरकारला झुकावे लागले आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, पंतप्रधान आता घाबरले आहेत, त्यांना रात्री 12 वाजता व्हिडिओ रिलीज करावा लागतो. मी विद्यार्थ्यांच्या बरोबर आहे असे त्यांना दाखवावे लागले. आता जे उपाययोजना करत आहेत, टास्क फोर्स नेमली, एसआयटी नेमली, सचिवांना बदलले, हे आधी का नाही केले? त्यामुळे आता त्यांना त्यांची चूक लक्षात आलेली आहे आणि विद्यार्थी आता शांत बसणार नाहीत हे लक्षात आल्यानंतर राजीनामा घेतला गेला आहे. अर्थात ही जबाबदारी आता कोणाकडे सोपवतात हे पहावे लागेल, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

तर दुसरीकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीकडे रवाना झाले आहेत. केंद्रात त्यांना संधी मिळणार असल्याची चर्चा गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू आहे. आता धर्मेंद्र प्रधान यांच्या जागी फडणवीस यांना संधी मिळणार का? असा प्रश्न अनेकांच्या मान्यता उपस्थित होत आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार मीडियाशी बोलताना म्हणाले की, 'जेन झीने रस्त्यावर उतरून आंदोलन केले. जेन झी सरकार बनवू शकते आणि सरकारला खाली खेचू शकते. धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. हा लोकशाही आणि संविधानाचा विजय आहे. नीट परीक्षेतील घोटाळ्यानंतर 23 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. सरकारची भूमिका गंभीर नव्हती. मुलांची आत्महत्या झाल्यावर आंदोलन पेटले. त्या आंदोलनाची धग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खुर्चीपर्यंत पोहोचली आहे. आम्ही आंदोलन मोडू शकतो, आंदोलन चिरडू शकतो, असे त्यांना वाटत होते. मात्र, अहिंसा मार्गाने आंदोलन करून यश मिळू शकते, हे जेन झीने दाखवून दिले.'

## 'हा युवकांच्या एकजुटीचा विजय'



**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला अखेर यश आले असून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठवला आहे. आता त्यावर पुढे काय निर्णय होती हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा व ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी युवा पिढीच्या या आंदोलनाच्या यशावर प्रतिक्रिया दिली आहे. युवा पिढीच्या एकजुटीचा हा विजय असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शरद पवार म्हणाले, युवकांनी सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडले असून हे लोकशाहीच्या शक्तीचे प्रतीक आहे. हा देशातील युवा शक्तीच्या एकजुटीचा विजय आहे. तसेच विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी ज्या पद्धतीने युवकांना नैतिक पाठबळ दिले त्याबद्दल विरोधी पक्षातील सर्व खासदारांचे मी आभार मानतो. देशातील लोकशाहीने कात टाकली आहे आणि त्याचे श्रेय देशातील युवकांना जाते.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, संयमाने आणि शांततेने युवा पिढीने आपल्या भावना देशाच्या नेतृत्वाच्या समोर मांडल्या आणि त्याला यश आले. मी स्वतः प्रधानमंत्र्यांना भेटलो आणि त्यांना विनंती केली की लोकशाहीत संवाद ठेवण्याची आवश्यकता असते. संवाद न ठेवणे, त्याचे दुष्परिणाम होत असतात. हे मी काही सांगायची गरज नाही. तुम्ही हा डायलॉग सुरू ठेवला पाहिजे. एकतर राजीनामा दिला पाहिजे किंवा संवाद साधून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे.

शरद पवार म्हणाले, माझे जे काही बोलणे झाले पंतप्रधानांसोबत, त्याचे परिणाम मला दिसले. पहिल्या चर्चेत विद्यार्थ्यांच्या मागण्या काही मान्य झाल्या नव्हत्या. दुसऱ्या राऊंडला एक सोडून बाकीच्या मागण्या केंद्र सरकारने विचार करण्याची भूमिका घेतली आणि तरीही युवा पिढीचा आग्रह शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याचा होता, तो आग्रह शिक्षण मंत्र्यांनी स्वीकारला आणि त्यांनी राजीनामा दिलेला आहे. मी युवा पिढीचे पुन्हा अभिनंदन करतो.

विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर केंद्र सरकार नरमले असल्याचे समोर आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील आता तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत.

देवेंद्र फडणवीस दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे आता फडणवीसांना केंद्रात संधी मिळणार का? असा प्रश्न देखील आता उपस्थित होत आहे. सोबतच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुद्धा तातडीने दिल्लीला रवाना होणार असल्याचे समजते.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जुलै २०२६


## रहाळपट्टी तांडा जि. प. शाळेत शालेय साहित्य वाटप



*छायाचित्र - विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटताना लेखक अय्युब पठाण यांच्यासोबत शिक्षक मनोज खुटे, बबन चव्हाण, आणि मुख्याध्यापक किरण आंबेकर आदी मान्यवर दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** जटवाडा केंद्रा अंतर्गत राहळपट्टी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत आषाढी वारी निमित्ताने गरीब विद्यार्थ्यांना प्रसिद्ध लेखक तथा कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या हस्ते शालेय साहित्य (वहया) यांचे वाटप करण्यात आले. तसेच चौथीच्या विद्यार्थ्यांना " कौतुकाची छाप" या पाठाचे सविस्तर विश्लेषण लेखक अय्युव पठाण यांनी वर्गात सांगितले आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी हे लेखकाला पाहून अक्षरशः भारावून गेले होते. त्यांनी आनंदाने " कौतुकाची थाप " या पाठाविषयी प्रश्न विचारले आणि श्री. पठाण यांनी त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली. पाठातील लेखकाला प्रत्यक्ष समोर पाहून विद्यार्थ्यांनी आनंदाने दप्तरमुक्त शनिवारचा आनंद मन मुरादपणे लुटला आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक किरण आंबेकर, कवी मनोज खुटे, सहशिक्षक बबन चव्हाण आणि परिसरातील पालक वर्ग व विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## पद्मभूषण बद्रीनारायणजी बारवाले यांचा स्मृतीसप्ताह विविध उपक्रमाने साजरा




**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात पद्मभूषण बद्रीनारायणजी बारवाले यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित स्मृती सप्ताह विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.या निमित्त आयोजित प्रेरणादायी व्याख्यानात श्रीमती सुहासिनी कुलकर्णी म्हणाल्या की, "विद्यार्थ्यांनी जीवनातील ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत. कठोर परिश्रमाशिवाय यश प्राप्त होत नाही." बलूनचे उदाहरण देत त्या म्हणाल्या की, "बलून त्याच्या रंगामुळे नव्हे, तर त्यातील वायूमुळे उंच भरारी घेतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे यश त्याने आत्मसात केलेल्या ज्ञान, कौशल्य आणि संस्कारांवर अवलंबून असते." फेसबुक, इन्स्टाग्राम यांसारख्या सामाजिक माध्यमांचा वापर सकारात्मक संवाद आणि ज्ञानवृद्धीसाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, पतंगाला उंच भरारी घेण्यासाठी जसा धागा आधार देतो, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालक आणि शिक्षक यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.स्वरसुमनांजली या सांस्कृतिक कार्यक्रमात युगंधरा केचे व त्यांच्या समूहाने शास्त्रीय संगीताची बहारदार मैफल सादर केली. 'रंगी सारी गुलाबी चुनरिया' या सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर 'बोलवा विठ्ठल' हा अभंग सादर करण्यात आला. तसेच, श्रोत्यांच्या आग्रहास्तव 'दमादम मस्त कलंदर' हे लोकप्रिय गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनाच्या सुरुवातीच्या टप्प्यात कठोर परिश्रम केल्यासच यशाचा मजबूत पाया रचला जातो. टीमवर्क, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि परिस्थितीनुरूप स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी शिस्त, सातत्यपूर्ण अध्ययन आणि आजीवन विद्यार्थी राहण्याच्या वृत्तीचे महत्त्व अधोरेखित केले.वृक्षदिंडी कार्यक्रमात डॉ. सुनीता भराडे यांनी बोन्साय वृक्ष, पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.स्मृती सप्ताहांतर्गत २१ जुलै रोजी गणपती नेत्रालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेत्रतपासणी करून आरोग्य शिबिर यशस्वीरीत्या पार पाडले.सप्ताहादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. 'ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षण' या विषयावरील निबंध स्पर्धेत अमित म्हस्के यांनी प्रथम, उन्नती टेला यांनी द्वितीय, तर श्रेया क्षीरसागर हिने तृतीय क्रमांक मिळविला.'माझे महाविद्यालय' या विषयावरील रिल्स स्पर्धेत विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि कल्पक सादरीकरणे केली.'माझा जालना' या विषयावरील भित्तीपत्रक स्पर्धेत लक्ष्मी प्रजापत प्रथम, श्रेया शिरसागर द्वितीय, तर आर्या वाकुडे हिने तृतीय क्रमांक पटकावला.उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धेत शहीद अन्सारी प्रथम, गौरी पारे द्वितीय, तर रुपाली खडेकर हिने तृतीय क्रमांक मिळविला.'टाकाऊपासून टिकाऊ' स्पर्धेत झीशा जावेश प्रथम, वैष्णवी मोरे द्वितीय, तर सत्यप्रिया श्रृंगारे आणि श्रेयांशी दास यांनी संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक मिळविला.'भावना व रंग' चित्रकला स्पर्धेत श्रेयांशी दास प्रथम, अंजली शिंदे द्वितीय, तर सिद्धी मदणकर आणि ऋतिका कांबळे यांनी संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक पटकावला.सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत दिव्या नागरे प्रथम, तब्बसुम शेख द्वितीय, तर अक्षदा सुरसे हिने तृतीय क्रमांक मिळविला.सांस्कृतिक कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मोहिनी रायबागकर, डॉ. चंद्रकांत धोत्रे, प्रा. अभिषेक ढेंबरे आणि प्रा. रुपाली तिडके यांनी विशेष परिश्रम घेतले.या स्मृती सप्ताहाच्या कार्यक्रमातविद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सूत्रसंचालन प्रा. सुधीर देशपांडे यांनी केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जुलै २०२६


## तेरणा हायस्कूल शाळेत आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** तेरणा हायस्कूल शाळेत टाळ व वाद्यांच्या गजरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात टाळ व वाद्यांच्या गजरात पालखीची मिरवणूक काढली. सर्व प्रथम विठ्ठल रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.शाळेतील शिक्षकांनी आषाढी एकादशीची माहिती देऊन वारकरी संप्रदायाचे महत्त्व विशद केले. या वेळी विद्यार्थ्यांनी अभंग सादर केले. या वेळी मुख्याध्यापक के.पी.पवार, केशवराव मुंडे, रमेश प्रधान , प्रदिप भाले, रमेश जोशी,उषा उदगे,भाग्यश्री काळे,माधुरी काटकर, दिपाली चांदे यांची उपस्थिती होतीयांची उपस्थिती होती.

## आषाढी एकादशीनिमित्त जिंतूर भक्तिमय; विद्यार्थ्यांच्या दिंड्यांनी शहर दुमदुमले



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने जिंतूर शहरात धार्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले. शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत आकर्षक दिंड्या काढत विठ्ठलनामाचा गजर केला. टाळ-मृदंगाच्या तालावर अभंगगायन, फुगड्या आणि पारंपरिक सादरीकरणामुळे शहरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले.शहरातील विविध शाळांमधून निघालेल्या दिंड्या शिवाजी चौक, वरुड वेस मार्गे श्री विठ्ठल मंदिरात दाखल झाल्या. मार्गावर नागरिकांनी पुष्पवृष्टी करून विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. श्री जवाहर विद्यालय, ज्ञानेश्वर विद्यालय, विद्या व्हॅली इंग्लिश स्कूल, संचारेश्वर विद्यालय, श्रीमती शकुंतला बोर्डीकर विद्यालय, चैतन्वोदय गुरुकुल आश्रम तसेच शहरातील अन्य शाळांतील विद्यार्थ्यांनी संतांचे देखावे, वारकरी वेशभूषा आणि दिंड्यांद्वारे वारकरी परंपरेचे दर्शन घडविले. आषाढी एकादशी-निमित्त जिंतूरचे प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरातन श्री विठ्ठल मंदिरात पहाटे पाच वाजता महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर रामकृष्ण हरी प्रभात फेरी मंडळाच्या वतीने पांडुरंग-रुक्मिणीची पालखी शहरातून भव्य दिंडीसह मिरविण्यात आली. "रामकृष्ण हरी"च्या अखंड गजराने संपूर्ण शहर दुमदुमून गेले.दिवसभर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. विविध शाळांतील विद्यार्थ्यांच्या दिंड्या, विठ्ठल-रुक्मिणी व वारकरी देखावे यामुळे मंदिर परिसराला पंढरपूरचे स्वरूप प्राप्त झाले होते. भक्ती, संस्कार आणि वारकरी परंपरेचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने स्वागत केले.

## विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ

वारीची परंपरा जगाला आदर्शवत, सर्व जाती धर्माचे लोक वारीत सहभागी होतात. वारीत कीर्तन, प्रवचन, भारुड, भजन या माध्यमातून वारकऱ्यांचे प्रबोधन सुरू असते. त्यातून समाज प्रबोधन सुद्धा होते. वारीमध्ये सर्व प्रकारचे लोक असतात. वारीमध्ये वारकऱ्याला विठ्ठल रुक्माई म्हणजेच माऊलीच्या भेटीची आस असते. विठ्ठल रुक्माई दोघेही कमरेवर हात ठेवून विटेवर उभे असतात. इथे कोणीही लहान मोठा नाही. स्त्री पुरुष समानतेचा संदेश देणारी ही प्रतिमा अहिंसेचाही पुरस्कर्ता असल्याचे आपल्याला दिसून येते. विठ्ठल रुक्माई दोघेही कोणत्याही प्रकारची शस्त्र बाळगत नाहीत. वारीत कर्मकांड करत नाही, धर्मनिरपेक्ष, भाषा निरपेक्ष, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा हा कोणताही भेदभाव न करता वारीमध्ये सर्व एकमेकांना माऊली म्हणत एकमेकांचा नमस्कार करतात. हा नमस्कार या व्यक्तीला नसून त्याच्यामध्ये असणाऱ्या देवत्वाला असतो. जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वाघटीं राम भावशुद्ध ॥ कोणत्याही कर्मकांडात न अडकता मन शुद्ध करण्यासाठी आपल्यातील विकारांवर विजय मिळवण्यासाठीच वारकरी वारीला येतो. त्याच्या साठी ईश्वर हा प्रत्येक ठिकाणी म्हणजे चराचरात भरला आहे. वारी म्हणजे शुद्धता, निर्मळता. वारी म्हणजे आपल्या कामातील प्रामाणिकपणा, कामावरील निष्ठा, वारी म्हणजे ज्ञान, वारी म्हणजे स्वतःच्या कामातील तत्परता, वारी म्हणजे स्वतःमधील अप्रमाणिकपणाला तिलांजली, वारी म्हणजे निवडलेल्या कामाला वाहून घेण्याची तयारी, वारी म्हणजे आपले कर्म, वारी म्हणजे आपला अभ्यास, वारी म्हणजे जीवनाचे सार, वारी म्हणजे आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी कष्ट करण्याची तयारी, वारी म्हणजे उद्दिष्टाकडे झेप, वारी म्हणजे जागृती, वारी म्हणजे विज्ञान, वारी म्हणजे संकल्प, वारी म्हणजे ध्येयाचा पाठलाग, वारी म्हणजे माणसं जोडण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे चॅलेंज स्वीकारण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे स्वतःला ओळखण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे दुसऱ्यांसाठी चांगलं करण्याची प्रेरणा, वारी म्हणजे संकटांना न घाबरण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे चिकित्सात्मक प्रेरक दृष्टिकोन, वारी म्हणजे उत्तम शरीर संपदा मिळवण्यासाठी करावी लागणारी कसरत, वारी म्हणजे नियमित प्राणायाम-योग करण्याची साधना. ज्ञानदेवे रचिला पाया। तुका झालासे कळस ॥ ग्यानबा-तुकोबांनी महाराष्ट्रात ही वारीची संस्कृती जपली वाढवली. वारीच्या मुळाशी आपल्याला गावातील शेतकरी व इतर सर्व समाजवर्ग दिसतो. पावसाळा सुरू होण्याआधी शेतकरी नांगरणी, कोळपणी करून पाऊस पडल्यानंतर पेरणी करतो. पेरणी झाल्यानंतर पुढे काही काळ त्याच्या हातात थोडा वेळ असतो. या कालखंडात हा शेतकरी व त्याला सहाय्यभूत समाज वर्ग वारीला जातात. वारीहून परत येईपर्यंत पेरणी फलित झालेली असते. पुढे तीन-चार महिने कष्ट करण्याची ऊर्जा त्याने वारीतून मिळवलेली असते. दसरा दिवाळीच्या दरम्यान आलेलं पीक विकून हातात दोन पैसे आलेले असतात. अशावेळी तो सण साजरे करून कार्तिकी वारीला प्रस्थान करतो व पुढील कार्यासाठी ऊर्जा मिळवतो. वारकरी सृष्टीच्या कल्याणाची मागणी पांडुरंगाकडे करतो. उत्तम पाऊस पडू दे, शेतात धनधान्य पिकू दे व सर्वांच्या पोटात अन्न जाऊ दे अशी साधी मागणी तो पांडुरंगाकडे करतो. इतर सर्व समाज घटकांबरोबरच शालेय जीवनाचेही असेच असते. जूनच्या मध्यावर्ती शाळा सुरू होतात. मुलं अभ्यासाला लागतात आणि लागलीच शाळा शाळांमध्ये शालेय पातळीवर वारीचे आयोजन केले जाते. शाळा शाळांमध्ये पालखीतील विठ्ठल रुक्माई चे पूजन केले जाते. ते स्थानिक परिसरात पालखी सहित दिंडी काढतात. या दिंडीत विद्यार्थी व विद्यार्थिनी वारकऱ्यांचा गणवेश घालत भजन, अभंगासह टाळ मृदुंगाच्या तालात विविध खेळ खेळतात. त्यात रिंगण, फुगड्या, लेझीम यांचा समावेश असतो. यावर्षी या दिंडीच्या माध्यमातून 'उल्लास नवभारत साक्षरता अभियानाचा प्रचार प्रसार' करण्यात आला. या दिंडीतून विद्यार्थ्यांना भरपूर आनंद व ऊर्जा मिळते. पुढील तीन-चार महिने म्हणजेच पहिली चाचणी व सहामाही परीक्षेपर्यंत ही ऊर्जा टिकून राहते. त्यानंतर दिवाळीची सुट्टी नंतर सुरु होणारे शाळेत कार्तिकी वारीचे वारे आषाढी प्रमाणेच वाहू लागतात. त्यातून मिळालेली ऊर्जा त्यांना वार्षिक परीक्षेपर्यंत कामात येते. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ आपल्या हजारो वर्षाच्या संत परंपरेने सांगितले आहे. संपूर्ण जग हे विष्णुमय आहे. यात कोणत्याही प्रकारचा भेदाभेद करणे अमंगळ आहे. संत श्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात. "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे" म्हणजेच ईश्वर वारीतील प्रत्येकाला वृक्ष, वेली, पशु, पक्षी, चराचरात दिसतो. तेव्हा त्या सर्वांची जपवणूक करणे आपले आद्य कर्तव्य आणि यातच आपले हित आहे. वारीच्या इतिहासाचा विचार करता वारीने केलेले कार्य हे त्याच्या अलौकिकत्वाला शोभावे असेच आहे. या देशा वर झालेल्या परकीय आक्रमणांचा व त्यामुळे येणाऱ्या गुलामगिरीच्या जाच्यात समाज भरडला जात असताना त्यांच्यात भारतीय संस्कृती, सभ्यता, तिचा अभिमान, स्वाभिमान टिकवून ठेवण्याची मोठी कामगिरी पार पाडली. यातूनच छत्रपती शिवरायांना स्वराज्य स्थापनेसाठी मावळे मिळालेत. स्वातंत्र्याचे हे बीजारोपण जे वारकऱ्यांनी केले ते आपल्याला विविध रूपात प्रकट होताना दिसते. काळाच्या गरजेनुसार वारकरी कधी धारकरी झालेत तर कधी सत्याग्रही झालेत. यातूनच आपल्याला सर्वांना हजारो वर्षांपासूनच्या गुलामगिरीतून मुक्ततेचा 15 ऑगस्ट 1947 रोजी सूर्योदय बघता आला. धन्यवाद.


**प्रशांत पुंडलिक शिरुडेके.**

रा. कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली.

मो. 9967817876

prashantshirude1674@gmail.com





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जुलै २०२६

## द्राक्षे

द्राक्षांचे घोस
दिसती किती छान
जो तो न्याहाळतो
हरपून देहभान

लांबट गोल द्राक्षे
रसरशीत खूप
सुकल्यावर घेतात
मनुकाचे रूप

मधासारखी चव
सदा आरोग्यदायी
लहान थोर मंडळी
मिटक्या मारीत खाई

नाशिकच्या भूमीत
द्राक्षांचे साम्राज्य
गोड रस पिण्यासाठी
लहान मुलं सज्ज

तोंडात टाकली की
थकवा दूर पळे
उन्हाळ्याच्या दिवसात
शरीरास गारवा मिळे



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**




## जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी निमित्त दिंडी व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला



**खुलताबाद (सनिराम गावंडे)** : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी केंद्र गल्ले बोरगाव येथे आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" या नामघोषाने संपूर्ण शाळा भक्तिरसात न्हाऊन निघाली. या शाळेत आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने जि. प. प्रा. शा. ठाकरवाडी येथे विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम साजरा करण्यात आला.याप्रसंगी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व, पंढरपूर वारीची परंपरा, वारकरी संप्रदायाची वैशिष्ट्ये तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांच्या समता, सेवा, सदाचार, स्वच्छता व मानवतेच्या शिकवणीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक व पालकांच्या उत्स्फूर्त सहभागातून स्वच्छता दिंडी, वृक्षारोपण दिंडी आणि 'शिक्षणाची वारी' काढण्यात आली. विविध घोषणांद्वारे स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यात आले.या प्रेरणादायी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतविचार, सामाजिक उत्तरदायित्व, पर्यावरणप्रेम आणि शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टीकोन दृढ झाला. कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक, श्री गालफाडे, श्रीमती साबळे श्रीमती घोरपडे आणि गावचे पोलिस पाटील श्री गंगाराम मेंगाळ, अंगणवाडी सेविका अणिता भागडे, लताबाई चाबुकस्वार पालक गुलाब बांगारे,वाळूबा मधे श्रीमती अरूणाबाई मेंगाळ,जनाबाई मधे, श्रीमती मनिषा साळवे, श्रीमती सिता पथवे, रंगुबाई मेंगाळ, अशा अनेक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी केला.

## आषाढी एकादशी उत्साहात साजरी



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : शनिवारी रोजी देवगिरी दौलताबाद किल्ल्यावर सकाळ पासून भाविकांची गर्दी झाली होतीसंत जनार्दन स्वामी यांची समाधी स्थळ असून मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायाचे लोक येथे प्रत्येक वारीला येथे दर्शनासाठी येतातपंचक्रो-शीतील केसापुरी, रामपुरी, आसेगाव, फती-याबाद, जांभाळा, टाकळी, शरणापूर, करोडी, वंजार-वाडी, माळीवाडा येथील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात दर्शनासाठी आलेल्या भक्त भाविकांना शेख बने मित्रमंडळ यांच्या वतीने फळे वाटप करण्यात आले होते वारकरी संप्रदायाचे लोकांना किल्ला मध्ये मोफत प्रवेश देण्यात आले होतेआज शनिवार असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी झाली होतीकिल्ला परिसरात छोटे मोठे व्यव-सायिकांनी खेळणीची, मिठाईच्या दुकाने थाटली होतेदौलताबाद पोलीस निरीक्षक नितीन खडागळे यांनी स्वत लक्ष केंद्रित करत बंदोबस्त ठेवला होता

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जुलै २०२६

## औरंगाबाद जिल्हा कबड्डी संघटनेतर्फे खेळाडू आयोग स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू

जिल्ह्यातील माजी आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय कबड्डी खेळाडूंना आवाहन औरंगाबाद जिल्हा कबड्डी असोसिएशन छत्रपती संभाजीनगर च्या वतीने खेळाडू आयोग स्थापनेच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. असोसिएशनच्या प्रशासनात खेळाडूचे प्रभावी व अर्थपूर्ण प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे,खेळाडू कल्याणाला प्राधान्य देणे. तसेच पारदर्शकता उत्तरदायित्व,प्रामाणिकता आणि सुशासनाची तत्त्वे अधिक बळकट करणे हा या खेळाडू आयोगाचा मुख्य उद्देश आहे. या आयोगाची स्थापना झाल्यानंतर असोसिएशनच्या प्रशासनामध्ये खेळाडूंना स्वत:चे हित अधिकार व कल्याण यांचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. खेल प्रशासनामध्येकबड्डी खेळाडूचा सक्रिय सहभाग वाढविणे व देशातील क्रीडा क्षेत्राचा दर्जा वाढवणे हा राष्ट्रीय क्रीडा अधिनियम २०२५ चा मुख्य उद्देश आहे. मार्गदर्शक तत्वे व राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ मधील तरतुदी प्रमाणेऔरंगाबाद जिल्हा कबडी असोसिएशनच्या अंतर्गत क्रीडा आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे.औरंगाबाद जिल्ह्यातील ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय स्पर्धेत भारताचे / महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेले आहे. मेजर ध्यानचंद खेलरत्न, अर्जुन पुरस्कार, शिव छत्रपती राज्य पुरस्कार किंवा वरिष्ठ, कुमार गटातील राष्ट्रीय स्पर्धेतील पदक प्राप्त किवा सहभागी खेळाडूना या क्रीडा आयोगात सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. सदरील खेळाडू हा किमान एक वर्ष अगोदर खेळातून निवृत्त झालेला असावा व खेळाडूचे वय २५ वर्षा पेक्षा जास्त व ७० वर्षापेक्षा कमी असावे. ही अट अनिवार्य आहे. औरंगाबाद जिल्हा कबड्डी असोसिएशनचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय खेळाडूंनी ५ ऑगस्ट २० २६ पर्यंत विहित नमुन्यातील अर्ज भरून जिल्हा संघटनेच्या अधिकृत ईमेलवर drmanikrathod @gmail.com अपलोड करून,संघटनेचे सचिव यांच्याकडे एम एस एम चे शारीरिक शिक्षण महाविद्यालय खडकेश्वर छत्रपती संभाजीनगरयेथे मूळप्रत सादर करावी.प्राप्त अर्जाची छाननी करून,पात्र खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये पुरुष व महिला यांना समान संधी राहील. पात्र ठरलेले खेळाडू औरंगाबाद जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकृत सभासद होतील व त्यांना या सभेचे सर्व अधिकार प्राप्त होतील. या योजनेचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त अतिउच्च कामगिरी करणाऱ्या माजी आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग घेऊन असोसिएशनचे प्रशासन अधिक बळकट करण्यासाठी सहकार्य करावे. असे आवहान औरंगाबाद जिल्हा कबड्डी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय पाथरीकर व सचिव प्रा . माणिक राठोड यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संघटनेच्या सचिवाशी (मो.नं.९५५२१६२१६५) सपर्क करावा.

**प्रा.डॉ. माणिक राठोड,**
**सचिवऔरंगाबाद जिल्हा कबड्डी असोसिएशन,**
**छत्रपती संभाजीनगर**

## गांधी - नेहरू - आंबेडकर विचारधारेचा विजय

नीट परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला हे जेन झी च्या आंदोलनाचे निर्विवाद नि निर्णायक यश म्हटले पाहिजे. यासाठी आंदोलनकर्ते अभिजीत दीपके आणि त्यांचे सहकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक व देशभरातील तमाम युवकांचे अभिनंदन करावे तेवढे कमीच! ब्रेव्हो जनरेशन झी. we are pruod of you! ज्या पद्धतीने ह्या युवकांनी हे आंदोलन चालवले त्याची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिली जाईल यात तीळमात्र शंका नाही. ह्या जेन झी पिढीच्या प्रतिनिधींनी गांधी - नेहरू - आंबेडकर यांची विचारधारा पुनरुज्जीवीत केली असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही! कोणत्याही एकच नेता नसताना, कोणताही छुपा किंवा उघड राजकीय अथवा कार्पोरेट पाठिंबा नसतांना, मुख्य प्रवाहातील माध्यमांची दुरान्वयानेही साथ नसताना अत्यंत उत्स्फूर्तपणे असे हे आंदोलन होते. गेल्या दशकभरापेक्षाही अधिक काळापासून युवकांच्या मनात साचलेला संताप, दडलेली निराशा, उद्वेग, पराकोटीचा भ्रमनिरास, कमालीची ढासळलेली व्यवस्था व यंत्रणा, उठसूठ प्रत्येक गोष्टीत दिला जाणारा हिंदू मुस्लिम भेदभावाचा रंग अशा अनेक कारणांनी वैतागलेली ही मुले या निमित्ताने एकत्र आली. त्यांच्या या एकत्रित येण्यात गरीब श्रीमंत, ग्रामीण शहरी नीमशहरी, उच्च वर्णीय, कनिष्ठ वर्गीय, स्त्री पुरुष असे सारी भेद गळून पडले होते. विशेष म्हणजे या आंदोलनात मुलांच्या बरोबरीने किंबहुना त्यांच्यापेक्षा अधिकच्या सक्रियतेने मुलींनी सहभाग घेतला. आक्रमकतेने, सरकारच्या दडपशाहीला भीक न घालता, जीवावर उदार होऊन निर्भीडपणे आपली उपस्थिती दाखवून देत सगळ्यांना चकित केले. त्यांनी केलेला भाषेचा वापर पाहून/ ऐकून तथाकथित संस्कृती रक्षकांच्या बुडाखाली जाळ निर्माण झाला! स्वतंत्र भारतात एवढ्या मोठ्या संख्येने क्वचितच मुली एखाद्या आंदोलनात सहभागी झाली असतील! हे एक अतिशय सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम करणारे परिवर्तन होते. यावर अधिक विस्ताराने मांडणी करता येईल. भारतीय लेकींचे हे रूप पाहून भले भले बुचकळ्यात पडले. नेहमीप्रमाणे सनातनी विचारांच्या अंधभक्तांनी त्यांच्या चरित्र आणि चारित्र्याची उठाठेव करून आपल्या रोगट, विषारी आणि जहरी पितृसत्ताक मनोवृत्तीचा चिखल उडवून घाण केलीच! पण ह्या नव युगाच्या जिजाऊ - अहिल्या - सावित्री - रमाईच्या लेकींनी जराही पत्रास न बाळगता फाट्यावर मारले! या आंदोलनातील मुलींचा सहभाग आणि कामगिरी यावर येत्या काळात खूप बोलले, लिहिले जाणार आहे. चर्चा केली जाणार आहे. न भूतो न भविष्यती असे हे आंदोलन होते. शिवाय LGBTQ समूहाने सुद्धा यात दखलपात्र सहभाग घेतला.जात, धर्म, पंथ, हिंदू, मुस्लिम, नक्षलवादी, देशद्रोही, असे सगळे खोटे मुद्दे या मुलांनी कचरा कुंडीत टाकून दिले आणि पुन्हा एकदा सिद्ध केले हा देश गांधी - नेहरू - आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा होता आणि त्यांच्याच विचाराने चालेल ! जेन झी hatts off to you!!:



**- प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार**
**नाशिक**

## मुरूममध्ये आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांना फराळ वाटप



**मुरूम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले)** : आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथील विठ्ठल साई कारखान्याच्या माळावरील विठ्ठल मंदिर परिसरात वारकऱ्यांसाठी फराळ वाटपाचा उपक्रम पार पडला. कॉर्नर स्टील सेंटर आणि रोटरी क्लब मुरूम सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांना १०० किलो साबुदाणा खिचडी, २० किलो खजूर आणि १५१ डझन केळींचे वाटप करण्यात आले. रोटेरियन शरणप्पा धुम्मा यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. या प्रसंगी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, भूषण पाताळे, सुनील राठोड, मुख्याध्यापक उल्हास घुरघुरे, मल्लिकार्जुन बदोले, प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ, अंदप्पा धुम्मा, धनराज धुम्मा तसेच कॉर्नर स्टील सेंटरचे कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल भाविक भक्तांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे कौतुक केले. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील विठ्ठल साई माळावरील विठ्ठल रुक्माई मंदिर येथे फराळाचे वाटप भाविक भक्तांना करताना रोटरीचे पदाधिकारी व अन्य.

### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

## किसन जाधव यांना महात्मा गांधी एक्सलन्स सर्व्हिस राष्ट्रीय अवॉर्ड २०२६ प्रदान



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील अंबरनगरचे दोन वेळा बिनविरोध सरपंच तथा धाराशिव जिल्हा मजूर सहकारी फेडरेशनचे उपाध्यक्ष किसन जाधव यांना नुकताच पुणे येथे महात्मा गांधी एक्सलन्स सर्व्हिस राष्ट्रीय अवॉर्ड २०२६ प्रदान करण्यात आला आहे. जिवॉन फाउंडेशन ही नीती आयोग आणि एमएसएमईकडे नोंदणीकृत संस्था असून या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आकाश कुमार साहू, व्यवस्थापकीय संचालक आशुतोष सिंग यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. आ. बसवराज पाटील यांचे निकटवर्ती असलेले किसन जाधव यांनी गावात सिमेंट रस्ते, गटारे आणि कायमस्वरूपी पाणीपुरवठा यासारखी विकासाची कामे केली. गोरगरिबांपर्यंत शासकीय योजना पोहोचवण्यासाठी ते मंत्रालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा करतात. सामाजिक सेवा, समुदाय कल्याणाच्या क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल, समाजउन्नतीसाठी आपली सेवा, जिद्द, वचनबद्धता खरोखरच प्रेरणादायी आहे. बसवराज पाटील यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून १५२९ लोकसंख्येच्या अंबरनगरमध्ये तब्बल ८ कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण करून जिल्ह्यात एक विक्रमच केला. या अगोदर त्यांना महाबळेश्वर येथे आदर्श सरपंच ग्रामरत्न राज्यस्तरीय पुरस्कार, जून महिन्यात अटल बिहारी वाजपेयी सेवारत्न सन्मान प्राप्त झाला. जाधव यांच्या सामाजिक आणि विकास कामामुळे त्यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल अंबरनगरसह धाराशिव जिल्ह्यातून विविध स्तरातून त्यांच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कंटेकुर जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त भव्य प्रभात फेरी व दिंडी उत्साहात



**कंटेकुर (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** सर्वप्रथम शाळेमध्ये विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. देवशयनी आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने कंटेकुर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या वतीने व गावकरी यांच्या माध्यमातून गावामध्ये भक्तिमय वातावरणात प्रभात फेरी व दिंडीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून हातात टाळ, मृदंग, भगवे ध्वज आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमा घेऊन गावातून दिंडी काढली."ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी", "विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल" अशा गजराने संपूर्ण गाव दुमदुमून गेले. विद्यार्थ्यांनी अभंग, भजन आणि हरिनामाचा गजर करत ग्रामस्थांना वारकरी संप्रदायातील भक्ती, संस्कार आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला.या प्रभात फेरीत शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी मिळुन विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून समाजात सद्भावना, बंधुभाव आणि चांगले संस्कार रुजावेत, अशी प्रार्थना करण्यात आली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना होण्यास मदत झाली असून ग्रामस्थांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

## जिंतूरच्या नूतन व्हॉइस मीडिया तालुका अध्यक्ष यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना दीदी साकोरे - बोर्डीकर यांच्या हस्ते व्हाईस ऑफ मीडियाच्या जिंतूर तालुकाध्यक्ष पदी सचिन रायपत्रीवार यांची नियुक्ती झाल्या बद्दल सत्कार करण्यात आला. त्या वेळी डॉ पंडित दराडे, मंडळ अध्यक्ष विलास भंडारी, सचिन आढे, विजय जाधव, प्रकाश गोरे, विष्णू बोर्डीकर, आदी उपस्थित होते.

## केंद्रीय शिक्षण मंत्री श्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा जालन्यात विविध विद्यार्थी संघटनांकडून स्वागत

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** नीट पेपर फुटी प्रकरणी,केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामाच्या चे विविध विद्यार्थी संघटनांनी स्वागत केले असून फटाके फोडून आपला आनंद व्यक्त केला. मराठवाडा भारतीय काँग्रेसचे पक्षाचे सचिव श्री मुसाभाई सय्यद, मनसेचे विद्यार्थी आघाडी प्रमुख श्री निखिल पाटील, उबाटा गटाचे विद्यार्थी आघाडी प्रमुख चिन्मय शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे जालना जिल्हा सचिव श्री आनंद देशमुख,एस ए पाय संघटनेचे सचिव प्रा.अरुण कांबळे, शहीद भगतसिंग विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री कुणाल भाऊ जगताप, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते प्रा. वैजनाथ लोंढे, छात्र भारती विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्ष स्मिता मुलकवाड,आर पी आय चे कार्यकर्ते सुभाष मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे विद्यार्थी कार्यकर्ते सिद्धार्थ पवार, बंजारा टायगर संघटनेचे अध्यक्ष श्री फुलसिंग पवार , मुस्लिम युवा संघटनेचे अध्यक्ष रियाज पठाण,आदींनी, आनंद व्यक्त करून, वंदे मातरम, जय हिंद, इन्कलाब जिंदाबाद . जिंदाबाद च्या घोषणा देत आपला रोष व्यक्त केला.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २६ जुलै २०२६

# अभिजीत, तू जिंकलास!

अभिजीत,
तू जिंकलास—
कारण तू नशिबाच्या उंबरठ्यावर
भिकेची वाटी घेऊन उभा नव्हतास;
तू आलास
आत्मविश्वासाचा जळता निखारा
छातीत घेऊन.

अभिजीत,
तू फक्त जिंकलास नाही
तर तू हजारो विद्यार्थ्यांच्या
छातीत दडपलेला हुंकार बनलास!
तू आत्मविश्वास घेऊन आलास,
म्हणून यश तुझ्या पायाशी आलं;
पण त्याहून मोठं म्हणजे—
तू स्वत:साठी नव्हे,
तर प्रत्येक लुटल्या गेलेल्या
विद्यार्थ्यासाठी उभा राहिलास.

ज्या पालकांनी
घामाच्या प्रत्येक थेंबातून
लेकरांची स्वप्नं उभी केली,
त्याच स्वप्नांवर
पेपरफोडीच्या दलालांनी,
भ्रष्ट व्यवस्थेने,
आणि सत्तेच्या मगरमिठीने
बुलडोझर फिरवला...
त्या चिरडलेल्या स्वप्नांचा
तू आवाज झालास!

तू जंतरमंतरवर बसला होतास,
फक्त एक आंदोलनकर्ता म्हणून नाही—
तर लाखो विद्यार्थ्यांच्या
अश्रूंना संविधानाची भाषा देणारा
एक जिवंत प्रश्न बनून.
तुझ्या घोषणांमध्ये
फक्त शब्द नव्हते;
तिथे आईच्या तुटलेल्या बांगड्यांचा आवाज होता,
वडिलांच्या फाटलेल्या तळहातांचा इतिहास होता,
आणि भविष्य लुटलेल्या तरुणाईचा
धगधगता ज्वालामुखी होता.

तू सत्तेला विचारलंस—
"विद्यार्थ्यांची स्वप्नं विकणाऱ्यांना
अजून किती दिवस संरक्षण देणार?"
तुझ्या निर्धाराने
जंतरमंतरचा प्रत्येक दगड साक्षीदार झाला—
की एक तरुण उठला,
आणि हजारो तरुणांना
सरळ उभं राहायला शिकवून गेला.

तू जिंकलास, अभिजीत,
कारण तू पदासाठी लढला नाहीस;
तू पिढ्यांच्या भविष्याचा
हिशेब मागितलास.
लक्षात ठेव—
व्यक्तीचा विजय इतिहास लिहीत नाही;
जनतेच्या वेदनेला आवाज देणारा
विद्रोहच इतिहास घडवतो.
सलाम तुला, अभिजीत!
तुला सलाम

- डॉ. बाळासाहेब लिहिणार

